॥ श्री ॥
॥ बाबा ॥
॥ गजानन भास्कर जीवन अमृत ॥
॥ ज्योत ज्योतीला मिळे ॥

॥गजानन भास्कर चरित्र लीला॥

॥श्री गणेशाय नम:॥
जयजयाजी उदारकीर्ती, जयजयाजी प्रतापज्योती ।
जयजयाजी हे गणपती, गौरीपुत्रा मयुरेश्वरा ॥ 1 ॥
कार्यारंभि तुझे स्मरण, करित आले जन ।
मोठमोठाले विद्वान, साधुसंत सत्पुरुष ॥ 2 ॥
तुझ्या कृपेची अगाध शक्ती, विघ्ने अवघी भस्म होती ।
कापुसाचा पाड किती, अग्नीपुढे दयाघना ॥ 3 ॥
आता आदिमाया सरस्वती, जी ब्रम्हाची होय प्रकृती ।
जी कवीवरांची ध्येयमूर्ती, ब्रम्हकुमारी शारदा ॥ 4 ॥
चिद् विलासे विष्णु ब्रम्हात्मेष, मरीचि कश्यप विवस्वत ।
सुर्यवंशी राम विख्यात, कुश, लव पुत्र कुळबीज ॥ 5 ॥
कुशवंशी कुळबीज समस्त, कुणबी अपभ्रंशे म्हणत ।
सुमंतादि क्षत्रिय कुळांत, राजे विख्यात इंदूवर्मा ॥ 6 ॥
चामकाई राणीपासून, दशरथ दानाजी नंदन ।
व-हाडा वाकोड गडाहून, आले म्हणून वाकोडे नाम ॥ 7 ॥
धोतर्डी दाताळा बोचरा, अकोली गौडखेडा ।
पंचभाऊ या पाच खेड्या, करिती रोकडा कारभार ॥ 8 ॥
यवन हल्ल्यात भले, सोने त्यांनी जाळले ।
बादशहा हताश झाले, वेगे 'जा' म्हणाले वाकोडे ॥ 9 ॥
कृपेने राया 'ये' म्हणाले, 'ले' म्हणोनि सोने दिले ।
'जा ये ले' अडनाव पडले, वाकोडे गेले बदलोनि ॥ 10 ॥

दानाजींचे पणतू, जयसिंह विख्यातु ।
त्यांचे पणतू गोमाजी होतु, योगाजी पणतू सद्भक्त ॥ 11 ॥
शांतीदेवी योगाजी पुत्र, कर्ताजी हरिभक्तपर ।
रघुजी भोसले सरदार, पत्नी सुंदर पार्वतीबाई ॥ 12 ॥
परि नाही संतति, गांवकरी यत्न करिती ।
कर्ताजी शांत पार्वती, कोडे न घालती देवावरी ॥ 13 ॥
योगी सुर्यासम तेजोराशी, स्वप्नी सांगती पाटलासी ।
फाल्गुन शुध्द प्रतिपदेसी, पय व्रतासी आरंभी ॥ 14 ॥
दोघेही गाईचे दूधावर, बारा दिवस रहा थोर ।
षोडशोपचारे श्रीधर, श्रध्दे सत्वर पुजावा ॥ 15 ॥
नित्य पवित्र राहोनि, द्वादशाक्षर मंत्र जपोनि ।
त्रयोदशि विष्णु पूजोनी विप्रा प्रार्थोनि भोजन द्यावे ॥ 16 ॥
श्रीकृपे जाण, तुजला होय पुत्र रत्न ।
श्रीफळ प्रसाद देऊन गेले निघुन योगीराज ॥ 17 ॥
जागे झाले पाटील, पुढे पाहिले नारळ ।
मना वाटले नवल, म्हणती विठ्ठल भेटले ॥ 18 ॥
विधिने हरि पूजोनि, पयव्रत केले दोघांनी ।
ब्राम्हणा भोजन देवोनि, प्रसाद सतीने घेतला ॥ 19 ॥
चैत्र पौर्णिमेप्रत, कर्ताजींना गजानन भेटत ।
भोजन करोनि वर देत, संतभक्त पुत्र तुज होईल ॥ 20 ॥
पार्वती असे गरोदर, पुत्राचे नाव ठेवी "भास्कर" ।
हा माझा भक्तवर, उध्दरी थोर सर्व जगा ॥ 21 ॥
मीच श्रीफळ तुला दिले, पयव्रत सांगितले ।
योगीराज गुप्त झाले, दंडवत केले दोघांनी ॥ 22 ॥
पंढरी आळंदी देहूहून, दोघे कार्तिक वारी करुन ।
आले अकोलीस जाण डोहळे संपूर्ण पूर्ण केले ॥ 23 ॥
सन अठराशे सालात, मार्गशीर्ष शुध्द एकादशीस ।

भास्कर महाराज आले जन्मास श्री गजाननास प्रगटावया ॥ 24 ॥
अर्धभागे अवतार, अर्धे भागे केला संसार ।
गजानन हेचि भास्कर आले सत्वर निजसेवे ॥ 25 ॥
गीता जयंतीचे दिवशी, सूर्योदय समयासी ।
गीता पाठ मंदिरासी, भास्कर जन्मासी शुभग्रह ॥ 26 ॥
सूर्यासम दैदिप्यमान प्राप्त झाले पुत्र रत्न ।
कर्ताजी गरीबा जाण, देती इष्ट दान अती प्रीती ॥ 27 ॥
विधियुक्त करोनि स्नान कर्ताजी पुत्र मुख पाहती जाण ।
जातक करिती ब्राम्हण, भास्कर नाव ठेवोनि ॥ 28 ॥
गजानन आज्ञेवरुन, कर्ताजींनी भास्कर नाव ठेऊन ।
विप्रा दक्षिणा देऊन, नगर भोजन देते झाले ॥ 29 ॥
कार्तिक शुध्द भाऊ-बिज, यमुना पुत्री चंद्रा सांज ।
गजानन गुरुराज आले घरी आज कर्ताजीच्या ॥ 30 ॥
बालयोगेश गजानन पाटला मागती भोजन ।
कोणी दिले हे पुत्र रत्न, कर्ताजी चरण वंदिती ॥ 31 ॥
गजानन प्रेमे जेवले, भास्करे उच्छिष्ट सेविले ।
तुलसीपत्र अर्पिले, साष्टांगे वंदिले योगिराजा ॥ 32 ॥
योगी गजानन बोलती, हा आमचा जिवलग सांगाती ।
यासी दाखवूनी पुढे प्रचिती, सेवक निश्चती करु आम्ही ॥ 33 ॥
परि हा अर्थ कोणाही कळेना, भावे केले श्रीसंत पूजना ।
दक्षिणा देता ते घेतिना, म्हणती पुत्रराणा देई पुढे ॥ 34 ॥
ते एकाएकीच भले योगीराज गुप्त झाले ।
सर्वांना नवल वाटले, दंडवत घातले भूवरी ॥ 35 ॥
योगिराज निघोनि जात, कर्ताजी झाले आनंदित ।
तो वार्ता सांगती राजदूत, युध्दा त्वरीत चलावे ॥ 36 ॥
भोसले महाराजांचा हुकूम, आहे रघूजी राजांचा ।
हल्ला आला रे इंग्रजांचा, प्रतिकार त्याचा करा वेगी ॥ 37 ॥

कर्ताजी शूरवीरांसहीत, आले शिरसोली मैदानात ।
स्वदेश रक्षण्या झटत, युध्द करित घनघोर ॥ 38 ॥
स्मरोनि योगियाप्रत, कर्ताजी इंग्रजा संहारित ।
मृत्यु पावले शिरसोलीत, धारातीर्थी जात वैकुंठी ॥ 39 ॥
भास्करासी पार्वतीबाईने, शिकवले जिजाबाईप्रमाणे ।
भास्करासी पूर्णपणे, युध्दा तिने निपुण केले ॥ 40 ॥
मराठेशाहीचे नाशाचा, काळ हा अंदाधुंदीचा ।
सन अठराशे अठराचा, झाला सूकाळ डाकूंचा ॥ 41 ॥
तेंव्हा अकोली जहागीरला, सन अठराशे विसाला ।
आला डाकू शेखडल्ला, सर्व गावाला लुटावया ॥ 42 ॥
तेंव्हा पार्वती म्हणे भास्करासी, लाज लावली क्षत्रिय कुळासी ।
अरे तुझा पिता देशकार्यासी, लढून वैकुंठासी गेला ॥ 43 ॥
त्याच शूरविर मर्दाचा, तू पुत्र आहेस रे सिंहाचा ।
विचार कर या गोष्टीचा, आठवी शिवाजीचा दृष्टांत ॥ 44 ॥
भास्कर मातेसी क्षमा मागत, युद्ध शिक्षण सर्वांना देत ।
स्त्रियाही केल्या निष्णात, स्वसंरक्षणार्थ आपुल्या ॥ 45 ॥
भास्करांनी रणश्रृंग फुंकले, सर्व शूर मर्द वीर जमविले ।
गढीवर स्त्रियांना ठेवले, द्वारी बैसले संरक्षक ॥ 46 ॥
सर्वांनी घेऊन शपथ, आवेशे चालले युध्दार्थ ।
स्मरोनि हरि रघुनाथ, भास्कर साह्यार्थ चालले ॥ 47 ॥
शूर वीरांसह भास्कर, घोड्यावरी होऊनि स्वार ।
उघडोनि वेशीचे द्वार, शत्रूसमोर ते आले ॥ 48 ॥
भास्कत म्हणती शेखडल्यासी, तू येरे आता युध्दासी ।
मूर्खा त्रासितो गरिबांसी, या मर्दासी मार पाहू ॥ 49 ॥
शेख गर्जोनि बोले भास्कराला, वेगे शरण येरे मला ।
अबे उपर है अल्ला और निचे शेखडल्ला ॥ 50 ॥
तो भास्करांनि काय केले, संकेत चिन्ह दखविले ।

घोड्यासी टाचेने मारिले, घाव घातले शत्रुवरी ॥ 51 ॥
तेंव्हा शेखडल्ला हरला शरण आला भास्कराला ।
म्हणे जीवदान द्यावे मला, पुन्हा अकोलीला न येई मी ॥ 52 ॥
भास्कर म्हणती त्यासी, मी न मारी शरणांगतासी ।
भय न धरी मानसी, सख्य मजसी करि आता ॥ 53 ॥
घेऊनी अल्लाचे शपथेसी, सख्य केले भास्करासी ।
डाकू गेले सातपूडयासी झाला सर्वांसी आनंद ॥ 54 ॥
पुढे गंगाबाई बरोबर विवाह करिती भास्कर ।
रक्षोनिया शौर्य नगर, आनंदे संसार चालवित ॥ 55 ॥
भागीरथी आणि रेणुका, दोन कन्या भास्करांना ।
भागीरथी दिली मु-ह्याला, दिली बरुडयाला रेणुका ॥ 56 ॥
सन अठराशे बावन्नात, बावन्नावे वर्षी निर्धार ।
भास्करा झाला पुत्र, नांव भिकाजी ठेविले ॥ 57 ॥
पुढे इंग्रजी कारभार आला, झाला पाटीलकीचा भला ।
जनहित चालीरितीला केला कारभार भास्करांनी ॥ 58 ॥
स्वातंत्र्याचा लढा झाला, देशवीरांनी पराक्रम केला ।
भास्करांनीही यत्न केला, परि पराभव झाला सर्वांचा ॥ 59 ॥
पुढे प्रेमभरे पाहि, ऐक्य केले लोंकात सर्वही ।
फुट वैर नसे दुही, दु:ख नाही कोणासी ॥ 60 ॥
घरोघरी गाई म्हशी, दुध पाजती बालकांसी ।
मर्दानी खेळ खेळती हौशी, रोग व्यसन कोणासी असेना ॥ 61 ॥
गोसावी शास्त्री महंत, सांगती रामायण भारत ।
भागवत धर्म लोक नांदत, चोरी गावात असेचि ना ॥ 62 ॥
बापरे न टळे कधीही होणार, हरिसूत्र मिथ्या कोण करणार ।
देव भक्तालागी संसार, करु देणार नाही कधि ॥ 63 ॥
भास्करांचा पुत्र भिकाजी, अश्ववावरुन जातसे नरसिंगपुरामाजी ।
तो वेढीला दृष्ट यवनांनी, मारण्यास्तव भिकाजीला ॥ 64 ॥

सर्व यवनांनी हल्ला केला, भिकाजीने जिकुंन सर्वांला ।
घोड्यावर उभा राहून भला, चालला तेरा नंबरात ॥ 65 ॥
शिरी आम्रफांदी लागत, भिकाजी तात्काळ मृत्यु पावत ।
भास्कर बहु शोक करित, झाले विरक्त पुत्र दु:खे ॥ 66 ॥
झाकेत करती रोज स्नान, मंदिरी करी विठ्ठल भजन ।
आता भेटतील गजानन, कृपाळू पूर्ण योगीराज ॥ 67 ॥
की पुढे भक्त हा अमुचा, श्री गजाननाची सत्य वाचा ।
प्रारब्धे चाले व्यवहार साचा, भास्करांसी येत वैराग्य ॥ 68 ॥
संकटीच आठवतो देव, निती धर्म सुचतो सर्व ।
हा सर्व जगाचा अनुभव, नाही गर्व भास्करा ॥ 69 ॥
एकदा ते पाटील भास्कर, बैसोनिया घोडयावर ।
जवळी ती विजयी तलवार, सर्व्हे नंबर बावन्नात पातले ॥ 70 ॥
पाटील सांगति गड्यांसी, कधी मारु नका रे बैलांसी ।
उन्हानी जीव कासाविसी, निश्चयेसी झाला असे ॥ 71 ॥
मांस होता वैशाख, सोळा कलांनी तपे अर्क ।
क्वचित कोठे न राहिले उदक, ऐसा प्रखर उन्हाळा ॥ 72 ॥
ऐसे मजुरास बोलत, तो एक सिद्ध पुढे येत ।
योगी गजानन संत, मूर्तीमंत दिगंबर ॥ 73 ॥
अजानबाहु तेज:पुंज, बोलती गजानन गुरुराज ।
तहान लागली बहू मज, पाणी पाज आता तू ॥ 74 ॥
नित्यमुक्त श्री गजानन, परब्रम्ह परिपूर्ण ।
ब्रम्ह चिद् विलासे करुन, आनंदे त्रिभूवनी फिरताती ॥ 75 ॥
भास्कर न ओळखती दिगंबर योग्यासी, पाहूनी क्रोध पाटलासी ।
अरे मी कोण हे न ओळखसी, पाणी मजसी मागती तू ॥ 76 ॥
अरे मी समशेर बहाद्दर, पाटील आहे जमेदार ।
कैसा मजसी मागतोस नीर, माझा अधिकार न जाणसि ॥ 77 ॥
म्हणती तृषाकांत गजानन, शतमान अश्वमेघांचे निमले पुण्य ।

लाधते तया दात्यास मनी आण, तू थोर भास्कर पुण्यशील ॥ 78 ॥
पाटील योगीराजा बोलले, गड्याजवळचे हि पाणी संपले ।
या विहिरीचे पाणी आटले, गाव दाविले पूर्वेस ॥ 79 ॥
धन्य गजानन योगिराज, म्हणती तूच मजला पाणी पाज ।
अरे क्षत्रिय कुळासी आज, नको लाज आणू ही ॥ 80 ॥
पूर्वी तुझ्या पुर्वजांनी, तान्हेल्यांना पाजले पाणी ।
स्वये हरि अनंत वेषांनी, जगतासी पाणी पाजतसे ॥ 81 ॥
अद्‌भुत योगीराजांची शक्ती, भास्कर आश्चर्ये पाहाती ।
पाणी नाही या विहिरी प्रती, कोरडी निश्चिती ती असे ॥ 82 ॥
बारा वर्षापासूनी या विहिरीला नाही पाणी ।
गजानन हे ऐकूनी, निघाले तेथूनि हसतचि ॥ 83 ॥
गजानन तेथूनि उठले, विहिरीचे जवळ आले ।
कृपेने आत पाहिले, गंगा यमुना प्रकट जाहल्या ॥ 84 ॥
बारा वर्षे पाणी रहित, विहीर बावन्न नंबरात ।
गजानन बघता विहिरीत, भरली क्षणात पाण्याने ॥ 85 ॥
कोरडया विहिरीला, जीवंत झरा फुटला ।
तव अवचित कूप गडगडिला, प्रलयांती खवळला सिंधु जैसा ॥ 86 ॥
म्हणती नित्यानंदाचे निजजीवन, भास्कराचे जवळच असून ।
या विषय मृगजळा भुलोन, स्वसंजीवपणा विसरला ॥ 87 ॥
कृपा करताच योगीराज, बोधजले भरे विहिर सर्व ।
स्वयेचि शुध्द पिवोनी नीर, बोलती हासोनि भास्करासी ॥ 88 ॥
अरे भास्करा, मी नव्हे वेडा, माझी हरली तृषेची पीडा ।
तू पाणी पी न धरी भीडा, बघ रोकडा चमत्कार ॥ 89 ॥
घोडयावरुनी पाहती भास्कर, पाण्याने भरली पूर्ण विहीर ।
उडी टाकूनिया सत्वर, साष्टांग नमस्कार घातला ॥ 90 ॥
कोरडया ठणठणीत विहिरीला, जीवंत झरा तुम्ही फोडीला ।
गंगा, यमुना, सरस्वतीला, नर्मदेसह प्रगट केले ॥ 91 ॥

आकोलीच्या या रानांत, एका शुष्क गर्दाडाप्रत ।
तुम्ही आणिले प्रयागतिर्थ, धन्य धन्य गुरुराया ॥ 92 ॥
गजानन म्हणती भास्करासी, गडया उठ त्वरेसी ।
मळा करवी या बारा एकरासी, ऊस, केळीसी लावोनि ॥ 93 ॥
इच्छित माग रे मज वर, सदा सर्वदा प्रसन्न थोर ।
तुज करोनिया अमर मी सुखकर भोग देतो ॥ 94 ॥
भास्कर लोटांगणी गुरुराया, पूरे करा ही संसार माया ।
म्हणोनी लागतसे पाया, आस काही न बाळाची ॥ 95 ॥
बोधामृताचे पाणी पिऊन, जिज्ञासा वैराग्य झाले पूर्ण ।
तलवार, घोडा, वस्त्रे,भूषण, दिला फेकून फेटा ही ॥ 96 ॥
भास्करांचा बघावया भाव, गुरु पश्चिम मार्गे घेती धाव ।
पाय धरावया जावे, रागे धोंडे मारिती भास्करासी ॥ 97 ॥
रक्तबंबाळ झाले शरीर, न सरे गुरुपदासी हांव ।
मजुर पाटलांना म्हणती, अश्वावरती बसून घरी चलावे ॥ 98 ॥
मालक अश्वावरी बैसावे, भोजनासी घरी चलावे ।
योगीयांचे मागे न जावे, आपण असो सांसारिक ॥ 99 ॥
थांबा थांबा हो गुरुमहाराज, धन्य माझे भाग्य आज ।
आता राखा माझी लाज, शरणांगता मज रक्षावे ॥ 100 ॥
खरी परिक्षा गुरु बघती, रागे धोंडे त्यासी मारिती ।
भास्कर मागे मागे धावती, येती काकुळती गजानन ॥ 101 ॥
ऐसे धावता पाच कोस, हरले त्यांचे पंचक्लेश ।
निरसोनिया पंचकोश, झाला नाश अहंकारा ॥ 102 ॥
मोठे अडगांवचे उत्तरेस, धुळीत लोळविले भास्करांस ।
छातीवर बैसोनिया खास, मारती गजानन श्री गुरु ॥ 103 ॥
पाटील गुरुंसी बोलती, पाषाण ह्रदयी मी निश्चिती ।
गुरुजी तुमचे हात दुखती, म्हणूनि चुरती चरण त्यांचे ॥ 104 ॥
मिथ्या दाखवूनि संताप, त्यांचे हरले त्रिविध ताप ।

भास्कर झाले निष्पाप, संत मायबाप कृपाळू ॥ 105 ॥
मग बोले योगेश्वर, मी आहे बाबा वेडा पीर ।
ऐसाच देईन रोज मार, घरचा धर तू रस्ता ॥ 106 ॥
येऊ म्हणे देह मन प्राणेसी, मी शरण तुम्हासी ।
न जाई कधीही घरासी, शिष्य निश्चयेसी तुमचा असे ॥ 107 ॥
तेंव्हा गुरु भास्करा सांगत, चातुर्मास तप करी उपोषित ।
परीक्षा कसून घेती हो संत, होय म्हणत भास्कर त्यांना ॥ 108 ॥
द्वारकेश्वरी गुरु नेत, चातुर्मास तप करवीत ।
भास्कर झाले योगीसम्राट, विश्वोध्दारार्थ पट्टशिष्य ॥ 109 ॥
म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथ, या दो शब्दांचा एकचि अर्थ ।
जे गुरुचि परि होत, दोन्ही ठायी एकचि ॥ 110 ॥
बघता हे धैर्ययुक्त वैराग्य, गुरु म्हणती धन्य भाग्य ।
आत्मज्ञानासी हाचि योग्य, यासी अयोग्य उपोक्षिणे ॥ 111 ॥
अत्यंत झालासे जर्जर, राहिला केवळ अस्थिपंजर ।
शुध्द झाला ज्ञानभास्कर, ठेवू अभयकर मस्तकी ॥ 112 ॥
प्रेमे गुरुंनी ह्रदयी धरिला, अभयकर माथा ठेविला ।
आपणासमान भास्कर केला, देह झाला पुण्यवंत ॥ 113 ॥
मस्तकी ठेवताच हात, भास्कर झाले ज्ञानवंत ।
मुक्तात्मा चौदेहातीत, विदेही शोभत शुक दुजा ॥ 114 ॥
तू ब्रम्हपुत्र खरोखर, करु आता जगदोध्दार ।
तुझ्या रुपे मीच साचार, गजानन भास्कर प्रगटला ॥ 115 ॥
मीच ईश सर्वेश्वर, मीच झालो गजानन भास्कर ।
पुर्वी कर्ताजीला हे गुह्य थोर, मीच सविस्तर सांगितले ॥ 116 ॥
आता भास्करांचे बंधु, नथ्थु पाटील नामे प्रसिध्दु ।
सामुग्री करोनिया सिद्धु, आले संत दर्शनासी ॥ 117 ॥
सर्व विप्र करुनी गोळा, केला गुरुपूजेचा सोहळा ।
सर्व भक्त झाले गोळा, घातल्या आंघोळा सर्वांसी ॥ 118 ॥

गजनना स्नान घातले, वस्त्रे भूषणे समर्पिले ।
केशरी गंध लावियले, कंठी घातले तुळशीहार ॥ 119 ॥
सुगंध अक्षता धुप, उजळीले ज्ञानदीप ।
पक्वान्ने करुनिया अमुप, गजानना खुप जेवविले ॥ 120 ॥
तेच उच्छिष्ट ताट भले, भास्करांचे पुढे ठेविले ।
सर्व भक्त आनंदिले, जेवू लागले जयघोषे ॥ 121 ॥
गजानने भास्कर पात्रावर, लघवी केली खरोखर ।
गुरुभक्त पूर्ण भास्कर, प्रसाद सत्वर भक्षिती ॥ 122 ॥
धन्यधन्य गुरुभक्त निष्पाप, ते मूत्रचि झाले शुध्द तूप ।
विप्रांना वाटला विकल्प, समर्थ प्रताप नेणती ॥ 123 ॥
संशयाऽत्मा विनश्यती, गुरु सर्व पात्री या रिती ।
लघवीचे भिषे तूप वाढिती, विप्र जेवती आनंदे ॥ 124 ॥
भगव देह चैतन्यघन, तैसेचि चिद्रुप गजानन ।
देहेंद्रिये मन प्राण, चैतन्यघन पूर्ण परब्रम्ह ॥ 125 ॥
सर्व जयजय बोलती बोल, पुंडलिक वरदे हरि विठ्ठल ।
श्री ज्ञानदेव तुकाराम, बाबा गजानन भास्कर ॥ 126 ॥
पूर्णांचे पूर्ण ब्राम्हण, स्वसंतोषि जेविले परिपूर्ण ।
मग दक्षिणा करोनि समर्पण, लोटांगण घातले ॥ 127 ॥
भास्कराचे रुप धरुन, स्वये सेवा करिती हो गजानन ।
गुरुशिष्य नावे रुपे दोन, उध्दराया जन प्रगटिले ॥ 128 ॥
नथु पाटलाचे सूत, पुंडलिकनामे ज्ञानीभक्त ।
भास्करांना दत्तक देत, दत्तविधान होतसे गुरुहस्ते ॥ 129 ॥
आता भास्कर महाराजांनी, भगवा वेष घेऊनि ।
विद् वत संन्यास घेतला त्यांनी, संकल्पा टाकोनि आनंदे ॥ 130 ॥
सम्यक ज्ञान वसा घेतला, गुरुसह मठी वास केला ।
कुळ, नाम, गोताला, उध्दरिले भुवनत्रयी ॥ 131 ॥
मी माझे ऐसी आठवण, विसरले जयाचे अंत:करण ।

पायी ते सन्यासी जाण, ऐसे गीतार्थ बोलिला ॥ 132 ॥
करोनि संकल्पाचा न्यास, गुरुसवे आले द्वारकेश्वरास ।
सदाशिव तत्व अंगिकारण्यास, पवित्र एकांत स्थानी आले ॥ 133 ॥
मीनानाथ आले उम-याहुनि, सवे शिष्या नरसिंगा घेऊनि ।
योगीयांचे वर्म योगी जाणुनि, अलिंगन देती प्रेमभरे ॥ 134 ॥
सवे घेऊनि भास्कराला, आले मिराजी मठाला ।
जिथे पेटविले होते चिलमाला, दर्शन देण्यास गुरु आले ॥ 135 ॥
गजानन उठता तात्काळ, लागली झोपडी प्रबळ ।
लोक म्हणती सकळ, फुटले कपाळ समर्थांचे ॥ 136 ॥
गजानन म्हणती मंजुळ, धीर धरा हे होईल देऊळ ।
सिद्धेश्वर घननीळ, येथे अढळ राहतील ॥ 137 ॥
हजारो गोसावी संत महंत, गजानन दर्शनासी येत ।
आकोली जहागिरीत, आनंद होत संतांचा ॥ 138 ॥
आकोलीत बहु चमत्कार करोन, रात्री उठोनि गजानन ।
सवे भास्करा घेऊन, आले पहा आकोलखेडी ॥ 139 ॥
विठ्ठल मंदिरासमोर, उभे राहती शिष्य – गुरुवर ।
अंधारी रात्र दोन प्रहर, दुर्गास पुत्रा जीवदान दिले ॥ 140 ॥
साष्टांग घालोनि नमस्कार, सर्व करिती जयजयकार ।
गुप्त जहाले शिष्य गुरुवर, सर्वांसमोर क्षणार्धे ॥ 141 ॥
स्वच्छंदे फिरत फिरत, गुरुशिष्य येती शेगांवात ।
बाळापुरवेसी, माळीपु-यांत, फुले नगरांत फिरताती ॥ 142 ॥
एक वर्षपर्यंत, शिवग्रामात दर्शन देत ।
लोक पिसा येडा म्हणत, दगड मारित सर्व जन ॥ 143 ॥
हनुमंताचे मंदिरात, सुरु होता सप्ताह सतत ।
गोविंदबुवांचेकिर्तनास रंग चढला त्या रात्री ॥ 144 ॥
त्यांनी पीतांबरा बाहेरी नेले, योगीराज गजानन दाविले ।
पिसावृत्तीत बैसलेले, वंदन केले साष्टांगे ॥ 145 ॥

गोविंदबुवा सत्वर, साष्टांग करिता नमस्कार ।
अदृश्य झाले गुरुवर, पीतांबर कर जोडिले ॥ 146 ॥
भास्करासह गजानन, अकोल्यात आले शेगांवाहून ।
खटाऊचे बंगल्यात उतरुन, केले भोजन आनंदे ॥ 147 ॥
तेथूनि मोट्यांचे शिवमंदिरा, गुरु घेऊनि आले भास्करा ।
जुने मंदिरी तेंव्हा खरा, मुक्काम बरा शेगांवी ॥ 148 ॥
शेगांवी असता गुरुवर, आले बंकटलाला ।
भावे करुनि नमस्कार, स्तवन अपार आरंभिले ॥ 149 ॥
प्रार्थोनि स्वमंदिरी नेले, राजोपचारे पूजन केले ।
समर्थ जेऊन तृप्त झाले, दर्शन घेतले सर्वांनी ॥ 150 ॥
तेंव्हा बंकटलाल शेठजीचे, चुलतबंधु इच्छाराम नावाचे ।
दर्शन घेऊन समर्थांचे, भोजनासाचे चला म्हणती ॥ 151 ॥
आग्रहे घरी नेऊनि, समर्था केली मेजवानी ।
पक्वान्ने ताटी वाढोनि, घ्या घ्या म्हणोनि विनविती ॥ 152 ॥
आग्रह बहु करिता, गुरुंने वांती केली तत्वतां ।
पुन्हा बळेचि सेविता, तळमळी चित्ता इच्छाराम ॥ 153 ॥
आग्रह करु नये संतांना, भास्कर सांगती सर्वांना ।
भावे शरण रिधा त्यांना, परि नथ्थु पाटलासी रुचेना ॥ 154 ॥
असो एकदा शेगावीहून, आकोलीस आले गजानन ।
मिराजी मठा उतरता जाण, आले भक्तगण वंदाया ॥ 155 ॥
ताटे आणिली वाढोनि, त-हेत-हेच्या पक्वान्नांनी ।
एकत्र केली भास्करांनी, घास गजाननांनी घेतले ॥ 156 ॥
भास्करांनी सर्वांना, शेष प्रसाद वाटला ।
सर्व भक्ती गुरु नमिला, जयघोष केला आनंदे ॥ 157 ॥
नथू पाटील बंधू भास्करांचे, पाय वंदूनि गजाननांचे ।
म्हणती यात्रे ऋणविमोचनचे, चला पयोष्णीचे स्नानासी ॥ 158 ॥
गुरु म्हणती तुम्ही जावे, मला वाटते येथे राहावे ।

या सिध्देश्वरि तीर्थ आगळे, आहे बरवे निर्मळ ॥ 159 ॥
परिते बहु आग्रह करिती, भास्कर त्यांना प्रेमे सांगती ।
समर्थांचे चरणाप्रती, तीर्थ वसती सर्वही ॥ 160 ॥
तीर्थे तया ठाया, येती पुनीत व्हावया ।
पर्वकाळ पाया, तळी वसे वैष्णवा ॥ 161 ॥
प्रतिमा ह्या अचेतन मूर्ती, संत सांगत देव असती ।
ज्ञानाचे चित् सागर निश्चिती, दर्शन देती भुक्ति-मुक्ती ॥ 162 ॥
गुरुसी दमणी बैसविले, वेगे ऋणमोचन तीर्था निघाले ।
तो मार्गी आश्चर्य झाले, श्रोते संत हि भले हो ॥ 163 ॥
संताचे वचन उल्लंघन, तेथे होते महाविघ्न ।
वाघ आला वनातून, आरोळी देऊन पुढे उभा ॥ 164 ॥
तेंव्हा सर्व घाबरले, थरथर कापू लागले ।
भास्कर त्यांना म्हणाले फळ भोगा चांगले आग्रहाचे ॥ 165 ॥
पाय धरोनि समर्थांचे, आरंभिले स्तवन वाचे ।
स्वामी रक्षण करा दिनांचे, लेकरे तुमची सर्वही ॥ 166 ॥
मग गजानना वंदिले, कौतुके वाघाकडे पाहिले ।
वाघाने लोटांगण घातले, पाय वंदिले भास्करांचे ॥ 167 ॥
अंगी फिरवूनी हात, म्हणती तूजा रे वनांत ।
राम राम स्मरे मनात, म्हणता त्वरित वाघ गेला ॥ 168 ॥
सर्वांसह भास्कर, गुरुसी करिती नमस्कार ।
करोनिया जयजयकार, स्तवन अपार आरंभिले ॥ 169 ॥
कर्ज निवारी मुद् गळेश्वर, पूर्णा करि पापांचा संहार ।
गजानन हे विघ्नहर, त्रिवेणी सुंदर लाभली ॥ 170 ॥
भास्कर सांगती सर्वांना, आग्रह करु नका गजानना ।
सर्व तीर्थांचा हा गुरुराणा, विकल्प मना धरु नका ॥ 171 ॥
भास्कर समर्था म्हणती, स्नान करावे गुरुमूर्ति ।
लोक संग्रहार्थ निश्चिती, संतहि पूजिती देवतीर्था ॥ 172 ॥

ऐसे भास्कर वचन ऐकले, गजानन हंसोन स्नान केले ।
वेदोक्त मंत्रे स्नान घातले, तीर्थ घेतले पयोष्णीचे ॥ 173 ॥
पंगत बैसली संतांची, भोजने हरिचिंतने साची ।
आदरे गुरुनामाची, गर्जना गजाननांची करिताती ॥ 174 ॥
किल्ला नरनारायणगड, समीप त्याचे धारगड ।
बहुस्थान हे अवघड, भुयार प्रचंड शिवाचे ॥ 175 ॥
भास्कर आणि गुरुराय, ध्यानी ध्यानी सदाशिव ।
शोध करित नरसिंगराव, आले स्वयमेव तेथेहि ॥ 176 ॥
भास्कर म्हणती नरसिंगा, तुम्ही भिक्षा का मागता ।
साकडे घालूनिया जगा, देता वाऊगा त्रास का? ॥ 177 ॥
नरसिंग म्हणती त्यासी, प्रारब्ध न टळे कोणासी ।
कुटुंब न पोसावे घरी, ही माधुकरा जगहिता ॥ 178 ॥
गजानन तया प्रसन्न होती, भास्करासह अक्रिय योग देती ।
नरनाळ्या किल्ल्या जाती, नरसिंग येती आकोटासी ॥ 179 ॥
तेथे योगविद्या भास्करासी, देते झाले पुण्यराशी ।
दिवा लावता दिव्याशी, प्रकाश दोघांसी सारखा ॥ 180 ॥
सूर्य आणि सूर्यकिरण, सदैव अभिन्न प्रकाशमान ।
भास्कर आणि गजानन, नित्य जाण एकरुप ॥ 181 ॥
द्वारकेश्वरींचा वृत्तांत, एकदा तहान लागली गुरुप्रत ।
स्वये पाणी निर्मिले पाय विहिरीत, पाताळगंगेसी उधाण येई ॥ 182 ॥
पाताळगंगेचे पाणी पिऊन, भास्कर पुसती गुरु लागुन ।
मी येतो गावातून, भाकरी घेऊन भोजना ॥ 183 ॥
अरे बामणाच्या पोरा, भोजन मागू उमावरा ।
आज सोमप्रदोष खरा, कोणाच्या घरा जाऊ नको ॥ 184 ॥
दंडकमंडलू जटाधारी, गोसावी आले शिवमंदिरी ।
ॐ नमः शिवाय शब्द करि, आला माघारी गुरुपाशि ॥ 185 ॥
झोळीत होती बहु पक्वान्न, तिघे करिती प्रेमे भोजन ।

भास्करांचि दृष्टी चुकवोन, उमारमण गुप्त झाले ॥ 186 ॥
इतक्यात लेहगांवचा, शंकरमाळी आला साचा ।
स्वप्नी दृष्टांत शिवाचा, झाला गुरुंचा दर्शनासी ॥ 187 ॥
गजानन माळ्यास म्हणती, शिव खोटे न बोलती ।
संशयाऽत्मा विनश्यति, गीता सांगती भास्कर त्या ॥ 188 ॥
गजानन करिता नमस्कार, माळ्यासी दिसले शंकर ।
आनंदे म्हणे जय हरहर, गिरीजावर पावला ॥ 189 ॥
माळी विसरे देहभान, लगेच दिसती गजानन ।
संशयग्रस्त झाले मन, घाली लोटांगण आदरे ॥ 190 ॥
गजानन म्हणती माळ्यासी, वेगे जा लेहगांवासी ।
सवे घेवूनि भास्करासी, पिंपळापासी गुरु आले ॥ 191 ॥
महादाजी पाटील गणेश, शेगांवी होते थोर पुरुष ।
कुकाजी, कडताजी त्यास पुत्र दोन होते पहा ॥ 192 ॥
गोमाजी महाराज नागझरीचे, कुकाजी पाटील भक्त त्यांचे ।
होते वारकरी पंढरीचे, विठोबाचे प्राणसखे ॥ 193 ॥
कुकाजींना नाही संतान, कडताजींना सहा नंदन ।
खंडू, गणपत, नारायण, मारुती हरि, कृष्णाजी ॥ 194 ॥
मुले गजानना वेडावित, नाना त-हेने त्रास देत ।
भास्कर महाराज बोलत, संता निवांत बसू द्या ॥ 195 ॥
हरि पाटील समर्था म्हणती, मजसवे चल खेळ रे कुस्ती ।
भास्कर प्रेमाने समजाविती, धरिली शांती गजानने ॥ 196 ॥
भास्कर म्हणती समर्थाला, वेगे आकोलीस चला ।
हे बघवे ना हो मला, मुले तुम्हास त्रास देती ॥ 197 ॥
हा त्रास नव्हे रे भक्तीप्रेमा, संतवचनी विश्वास धरा ।
भविष्याते अवधारा, पाटील माझे आत्मज ॥ 198 ॥
ऐसे भास्करांना जाण, प्रेमे सांगती गजानन ।
भास्कर भविष्य जाणून, गुरुवचन पाळती ॥ 199 ॥

एकदा हरि पाटील आले, गजाननासी म्हणाले ।
ऊठ, मजसवे कुस्ती खेळे, ना तरी भले देऊ मार ॥ 200 ॥
तेंव्हा पुढे होऊनि भास्कर, पाटलांना सांगती विचार ।
अहो पाटील आपण जमेदार, असा क्षत्रिय वीर विख्यात ॥ 201 ॥
त्रासवू नका हो संताला, शोभत नाही पाटलाला ।
रक्षावे गाई भक्तांला, भूषण शूराला हेच असे ॥ 202 ॥
डाकू-चोर-गुंडांसी, शिक्षा करा दृष्टांसी ।
सांभाळा दीन गरिबांसी, पाटील कुळासी हे काम ॥ 203 ॥
होईल अंगी बळ, तरी फजित करावे खळ ।
नका करु संतांचा छळ, मिळेल फळ श्रीकृपे ॥ 204 ॥
पाटील म्हणती भास्करासी, सामर्थ्य पाहू दया आम्हासी ।
तळमळ न करा मानसी, तुम्ही निश्चयेसी स्वस्थ रहा ॥ 205 ॥
यात नका घेऊ भाग, पाहू द्या यांचा योग ।
ऐसे सांगोनिया भास्करास, समर्था सांग बोलती ॥ 206 ॥
समर्थ म्हणती तू बलवंत, उठवी आता मजप्रत ।
पाटलांनी धरिले हात, परि गुरु न हालती तीळभरी ॥ 207 ॥
पाटील शिकस्त करिती, सर्व गळोनी गेली शक्ती ।
मग गुरुंस वंदिती, कुस्ती शिकविली मुलांना ॥ 208 ॥
आदरे करुनि नमस्कारा, म्हणती साधु हाच श्रेष्ठ खरा ।
हसू आले भास्करा, राग गुरुवरा नसेचि ॥ 209 ॥
एकदा ऐसे झाले, ऊस घेऊनी आले मूले ।
गजानना त्रासविण्या भले, ते देखिले भास्करांनि ॥ 210 ॥
भास्करा म्हणती तयाप्रत, अहो आपण पाटीलपुत्र ।
संत वंदावे हे पवित्र, व्यर्थ दुष्कृत्य करु नये ॥ 211 ॥
तेव्हा ते म्हणत, तुम्ही भाग न घ्यावा यांत ।
हे योगेश्वर विख्यात, परिक्षा त्वरित आम्ही घेऊ ॥ 212 ॥
भास्करा म्हणती गुरुवर, शांती धरावी निरंतर ।

हे आहे सर्व प्रेमळ, काही तळमळ करु नये ॥ 213 ॥
श्रीगुरु स्वस्थ बैसले, मुले ऊस मारण्या सिध्द झाले ।
ऊस वरचेवर मोडिले, वळहि न उठले गजानना ॥ 214 ॥
शुध्द कसोनि पहावे, वरच्या रंगा न भुलावे ।
अपूर्व देखता बरवे, सर्व पुत्रभावे शरण आले ॥ 215 ॥
ऊस हातांनी पिळून, सर्व मुलांना केले रसपान ।
धन्य गुरुगजानन, योगी पूर्ण कळले हो ॥ 216 ॥
मग सर्व पाटील पुत्र, झाले श्रींचे थोर भक्त ।
खंडू पाटील दर्शना येत, पुत्र होत श्रीकृपे ॥ 217 ॥
मग श्रीगुरुसमवेत भास्कार अडगावी येत ।
उतरले दत्त मंदिरात, गर्दी होत दर्शनाची ॥ 218 ॥
माला बुक्कांचा अपार, वर्षाव करिती संतावर ।
भक्त करिती जयजयकार, पुष्पसंभार वर्षोनी ॥ 219 ॥
अडगावचे वतनदार बडे, अमृतराव देशपांडे ।
दर्शना आले समर्थाकडे, म्हणती वेडे लोक हे ॥ 220 ॥
त्यांचे मनात विचार लहरी, म्हणती मूर्ती भ्रष्ट सारी ।
अंगकांती नाही गोरी, वदोनी घरी जीते झाले ॥ 221 ॥
भस्कारांनी ते जाणले, मन विकल्पे यांचे भरले ।
धन मन गर्वामुळे,संता भले मानती ना ॥ 222 ॥
देशपांडे गेले सदनी पोटशूळ झाला जोरांनी ।
उपाय केले वैदयांनी गुण कशानी येईना ॥ 223 ॥
भास्करा म्हणती सांगा खरे, पोटशूळ झाला का बरे ।
विकल्प कोणी न तरे, स्मरा आदरे गुरुराणा ॥ 224 ॥
तुम्ही संतांची केली निंदा, म्हणुनी झाला हो वांदा ।
भावे गुरुसी वंदा, शांती सदा मिळेल तुम्हा ॥ 225 ॥
देशपांडे म्हणती भास्करा, माझे अपराध क्षमा करा ।
पोटासी लावताच अंगारा, गुण निर्धारा आला हो ॥ 226 ॥

सन अठराशे चौ-यांशीसी, गुरु आले सावळापुरासी ।
गावकरी येता दर्शनासी, समर्थ भक्तांसी सांगती ॥ 227 ॥
पयोष्णी करुनि स्नान, या सर्व पूजा घेऊन ।
स्नान करोनि गजानन, पूर्णातीरी जाण बैसले ॥ 228 ॥
देखा साधक निघोनि जाये, मागा पाऊलांची ओळ राहे ।
तेथे ठायी ठयी होय, आणिमादिक ॥ 229 ॥
गजानन भजन करिती,स्नान करुन भक्त येती ।
गजानन सर्वांना सांगती, केशवमूर्ती आहे येथे ॥ 230 ॥
पूजा करुन भक्त बघत, घवघवीत मूर्तीमंत ।
मूर्ती काढुनि त्वरित, संस्थापित गुरुहस्ते ॥ 231 ॥
केशवराजांची मूर्ती, भास्कर भक्तांना सांगती ।
आदरे रोज करा पूजा आरती, इच्छा पुरती सर्वांच्या ॥ 232 ॥
अपार यात्रा तेथे येत, केशवासी भावे भजत ।
धन्य गजानन संत, देव दावित शिष्यांसी ॥ 233 ॥
एकोणवीसशे चौरेचाळीस संवत्,माघ शु. पौर्णिमेप्रत ।
श्री नरसिंगबुवा समाधीत, आकोटात बैसती हो ॥ 234 ॥
हरिबाबा नावाचे, पट्टशिष्य नरसिंगबुवाचे ।
पाय वंदुनि गजाननाचे, दर्शन भास्करांचे घेती ॥ 235 ॥
भास्करांसी केला प्रश्न, मज सांगा खरे साधन ।
भास्कर म्हणती हरिस्मरण, तारकपूर्ण मंत्रराज ॥ 236 ॥
गजानन म्हणती मधुरोत्तरी, "तू हरि ओम" हा जप करी ।
निष्ठा ठेव गुरुवरी, हरि सर्व करी कार्य तुझे ॥ 237 ॥
गजानन येती बेळु-यासी, गणपत पाटलांचे घरी ।
किसन पाटील पूजा करी, बरोबरी संपत पाटीलही ॥ 238 ॥
सवे तानबाई नावाची, कन्या संपत पाटलाची ।
भास्करा ही होईल तुझी सून, हसत बोलीले गजानन ॥ 239 ॥
भास्करांचे दत्तक पुंडलिक, गुरु गजानना न मानित ।

चंद्रभागा देवीसी आराधित, पुंडलिका होते दिव्यज्ञान ॥ 240 ॥
हे जाणोनि गजानन, स्वयेचि वरदहस्त ठेवून ।
पुंडलिकासी पूर्ण ज्ञान देऊन, शुध्द बुध्द केला तया ॥ 241 ॥
ऐक ऐक बा पुंडलिका, भेद ना पाही ब्रम्ही लोका ।
विश्वात पाहि मजचि एका, करी निका भक्तीयोग हा ॥ 242 ॥
कृष्णअजी पाटलाचे मळ्यात, श्रीगुरु भास्करासह येत ।
पाटलांना आनंद बहुत, सेवा करीत भावे त्याची ॥ 243 ॥
कृष्णाजी पाटलांचा भाव, मळ्यात राहविले गुरुदेव ।
नित्य अर्पिती पूजा सर्व, धन्य दैव तयांचे ॥ 244 ॥
समर्थ बैसले पलंगावरी, तो तेथे आले ब्रम्हगिरी ।
पाटला बोलती मधुरोत्तरी, शिदा सत्वरी आम्हा द्या ॥ 245 ॥
पाटील दयाळू अत्यंत, होत बहुत धनवंत ।
सर्व सामान त्यांना देत, केले तृप्त गोसाव्यांना ॥ 246 ॥
परि पोटभरे होते ते महंत, दंभे पोथी लोका सांगत, ।
आत्माज्ञानाच्या गप्पा मारत, भोळे भोंदित वृत्तीज्ञाने ॥ 247 ॥
नैनं छिन्दन्ति शस्त्राणि, हा श्लोक सांगती गर्जोनि ।
हे समर्थ दिसती वेडयावाणी, खरा ज्ञानी संत नसे ॥ 248 ॥
श्रीगुरुंचे उणे ऐकून, भास्करांचे दुखावले मन ।
तो लीला दाविती गजानन, योगाग्नि जाण प्रगटोनि ॥ 249 ॥
योगाग्नीच्या विस्तवाने, गादी पेटली चहुबाजूने ।
जाळ झाला पूर्णपणे, ते गुह्य भास्कराने जाणले ॥ 250 ॥
समर्थ म्हणती ब्रम्हगिरी, यावे आता गादीवरी ।
गीतेची वाणी खरी करी, माझे शेजारी बैसोनि ॥ 251 ॥
समर्थ आज्ञा होताक्षणी, भास्कर गेले धावोनि ।
ब्रम्हगिरीस उचलोनि, आणिले त्यांनी तत्क्षणा ॥ 252 ॥
भास्करांनी उचलिले वर, म्हणती बैस रे या पलंगावर ।
ब्रम्हगिरी कापोनि थरथर, करी नमस्कार गजानना ॥ 253 ॥

म्हणे तुम्ही ज्ञानभास्कर, बहुपापी मी मुर्ख पामर ।
मजला आता क्षमा कर, गुरुवर मायबापा ॥ 254 ॥
ब्रम्हगिरी पडे पाया, गजानना आली दया ।
सोडा भास्करा पोटभ-या या, जा निघोनिया येथोनि ॥ 255 ॥
कां सांडिसी गृहस्थाश्रम, का सांडिसी क्रियाकर्म ।
कां सांडिसी कुळीचे धर्म, आहे ते वर्म वेगळेची ॥ 256 ॥
ऐसा घेई का रे संन्यास, करी संकल्पाचा नाश ।
मग नमूनि श्रीगुरुस, गोसावी तीर्थास चालले ॥ 257 ॥
लोक करीती जयजयकार, वर्षती पुष्पसंभार ।
गजानन हेचि ईश्वर, म्हणती भास्कर गर्जोनि ॥ 258 ॥
भास्कराचे खरे वचन, गुरुदेव हे गजानन ।
चमत्कार हे धन्यधन्य, सर्व लोटांगण घालिती ॥ 259 ॥
समर्थांच्या बरोबर, निस्सीम भक्त होते चार ।
भास्कर – बाळाभाऊ – पितांबर, उमरावतीचा गणेश आप्पा ॥ 260 ॥
रामचंद्र गुरव त्याचपरी, राहात होते बरोबरी ।
हे पाच पांडव श्रीहरी, गजानन शोभू लागले ॥ 261 ॥
शेगांवीहुन अडगांवात, गुरु आले दत्तमंदिरात ।
गावकरी पूजा करीत, पक्वान्ने आणित वाढोनि ॥ 262 ॥
माळी नामदेव नावाचा, गरीब भक्त समर्थांचा ।
नैवेद्य आणला भाकरीचा, ठेचा मिर्चीचा त्यावर ॥ 263 ॥
गजानन घेऊनि भाकर, कांदा मिर्ची कोशिंबीर ।
खाऊन देती ढेकर, येती द्वरकेश्वर मंदिरी ॥ 264 ॥
गुरुचे हे तपोस्थान, भास्करांना दिले गुह्यज्ञान ।
ही सिध्द तपोभूमी पुरातन, येथे देवगण मूर्तीमंत ॥ 265 ॥
भास्करा आणि गुरुनाथ, गुप्त रुपे सामाधीस्त ।
तपश्चर्या करती स्वस्थ, वृक्ष अश्वत्थ पुढे असे ॥ 266 ॥
उत्तम विठोबा मानकर, भास्करा प्रार्थोनि सत्वर ।

पिंप्रीस आणोनि गुरुवर, उत्सव थोर केला असे ॥ 267 ॥
तेव्हा भास्करा आली दया, आदरे सांगती गुरुराया ।
बघा हो शेतक-यांची स्थितीया, नाही खावया अन्न पुरे ॥ 268 ॥
सदगुरु गजानन उठले, मळ्यामधे जाते झाले ।
कांदा-वांगे भक्षिले, सुखी केले वरदाने ॥ 269 ॥
गजानन हसून बोलती, पीक येईल या मळ्याप्रती ।
कांदा-वांगे घेऊनि हाती, प्रेमे हाणिती उत्तमा ॥ 270 ॥
भास्कर म्हणती सप्रेम, अहो पाटील आपण उत्तम ।
उद्योगी म्हणा राम राम, शेतीत काम नित्य करा ॥ 271 ॥
सकलांना सांगोनिया ज्ञान, भजन करीत गिण गिण ।
भास्करासवे गजानन, जाती निघोनी शेगांवी ॥ 272 ॥
एकदा भास्कराचे बरोबरी, गजानन आले नागपुरी ।
गोपाळबुवा बुटीचे घरी, भक्ती खरी जाणोनि ॥ 273 ॥
गुरुसी सर्व नामस्कारिती, राजोपचारे पूजिती ।
भास्कर चमत्कार सांगती, भक्ताप्रती झाले ते ॥ 274 ॥
पुढे समर्थ तेथून भले, राजगृहाकडे आले ।
रघुजीरावांनी पूजन केले, श्रीगुरुंसह भास्कराचे ॥ 275 ॥
भास्कर सांगती गुरुवचन, सरकारी जागा घ्यावी मागून ।
अर्ज करिती भक्तजन, जागेचा पूर्ण जिल्हाध्यक्षा ॥ 276 ॥
शेगांवचे पूर्वेचा, कुंभारवाडयाचे जवळचा ।
गाढव भुंकी मळ्याचा, नंबर साचा घेतला ॥ 277 ॥
हरि पाटलाचे अर्जावरुन, जागा मंदिरा मिळाली पूर्ण।
सातशे त्रेचाळीस नंबरातून, एक एकर जाण संस्थाना ॥ 278 ॥
जिल्हाध्यक्ष साहेबांनी, जागा दिली आनंदानी ।
काम चालविले भक्तांनी, मंदिर ते स्थानी बांधावया ॥ 279 ॥
सर्व लोक आनंदले, धाबे ते प्रथम बांधले ।
परकोट मग आरंभिले, काम चालले सप्रेमे ॥ 280 ॥

मग जुने मठातून भले, गजानन नवे मठी आले ।
सामानाचे गाडीत बैसले, बैल चालले आपोआप ॥ 281 ॥
एकदा शेगांवाहून, आकोलीस आले गजानन ।
मिराजी मठी मंडप देऊन, सप्ताह पूर्ण आरंभिला ॥ 282 ॥
तेथे कुत्रा पावला मरण, भास्करा सांगती गजानन ।
यासी तू जीवंत करी पूर्ण, भास्कर हसून जवळ आले ॥ 283 ॥
कुत्र्यासी लाविताची हात, कुत्रा झाला जीवंत ।
गजाननासी वंदित, पाय चाटीत भास्करांचे ॥ 284 ॥
शेगांवी असता गजानन, दर्शना येती भक्त दूरोन ।
भास्कर त्यांना देती भोजन, प्रसाद घेवोनि ते जाती ॥ 285 ॥
सुखलाल अग्रवाल भला, रहात असे बाळापुराला ।
घेऊन आला द्वाड गायीला, गजाननाला भेटावया ॥ 286 ॥
वनगाईचे समान क्रूर, गाय होती अती भयंकर ।
लोक पळती भीतीने दूर, सर्व बाळापूर त्रासले ॥ 287 ॥
ती अति प्रयत्ने बांधोनि, शेगांवी आले घेवोनि ।
दूरोनि पाहता भास्करांनी, गुरुलागोनि प्रार्थिले ॥ 288 ॥
गुरुजी तुम्ही दयावंत, ही गाय करा आता शांत ।
प्रेमे जोडोनिया हात, चला म्हणती गाईपासी ॥ 289 ॥
भास्करांची ऐकोनी विनंती, बाहेर आली गुरुंची मूर्ती ।
गायीकडे प्रेमे बघती, सोड रे म्हणती गायीला ॥ 290 ॥
दृष्टी पडताच संतांची, झाली शांत वृत्ती गायीची ।
भास्कर म्हणती आमुची, गुरुमाय साची कृपाळु ॥ 291 ॥
अत्यानंद झाला भास्कराला, मठांत ठेविले गायीला ।
म्हणती हिचे दूध गजाननाला, प्यावया देईन मी ॥ 292 ॥
सप्ताही अकोलीस आले गजानन, जेथे भास्करपुत्र पुंडलिक जाण ।
तयासी पूर्ण काम करोन, भागवताची संथा देती ॥ 293 ॥
कुलदेवता चंद्रभागे करुन, तुज आहे रे त्रिकाळ ज्ञान ।

संतकृपा तुजवर पूर्ण, गुरु थोपटून बोलले ॥ 294 ॥
भक्त म्हणती भास्करासी, काही प्रसाद द्या आम्हासी ।
अक्षय कृपा आकोलीसी, व्हावी खासी संतांची ॥ 295 ॥
श्री गजाननांच्या पादुका, श्री भास्करे दिल्या देखा ।
मिराजीचे मठात स्थापूनिया, शेगावाप्रत येते झाले ॥ 296 ॥
सन एकोणीसशे सहा साली, गुरु आले बाळापुरासी ।
बाळकृष्ण मंदिरा दासनवमीसी, भास्करासह उत्सवा ॥ 297 ॥
बाळपुरी आनंद झाला, दशमीचा उत्सव संपला ।
पिसाळला कुत्रा भास्कराला, शुक्रवारला चावला की ॥ 298 ॥
तो अवघा ऐकून, महराज वदले हांसून ।
हत्या- वैर आणि ऋण, हे कोणासी चुकेना ॥ 299 ॥
सुखलालच्या गायीठायी, द्वाडपणा जो होता पाही ।
तो या भास्करे लवलाही, शेगांवी दवडिला ॥ 300 ॥
ते तिचे द्वाडपणा, कुत्रे येथे झाले जाण ।
तेच चावले येऊन, या पाटील भास्कराला ॥ 301 ॥
तिचा हरण्या द् वाडपणा, मशी याने केली प्रार्थना ।
हिचे प्यावया दुध जाणा, ऐसा भास्कर मतलबी ॥ 302 ॥
दुध पिता वाटते गोड, आता कां रे चालले जड ।
नको पडदा ठेवूस आड, वाचवू का मी सांग तुला ॥ 303 ॥
हे कुत्रे निमित्त झाले, तुझे आयुष्य मुळीच सरले ।
आता पाहिजे प्रयाण केले तू या सोडून मृत्युलोकां ॥ 304 ॥
जरी इच्छा असेल मनी, वांचण्याची तुजलागूनी ।
तरी तुझे मी यापासुनी, रक्षण वेडया करीन ॥ 305 ॥
भास्कर बोले त्यावरी, मी अजाण सर्वतोपरी ।
जे असेल अंतरी, आपुल्या तेच करावे ॥ 306 ॥
ऐसे ऐकता भाषण, संतोषले गजानन ।
ख-याप्रती समाधान खरे बोलता होतसे ॥ 307 ॥

मूळ नक्षत्री कूत्रे डसले, सर्व लोक घाबरले ।
वैद्य डॉक्टर मांत्रिक आले, यत्न करती सर्वही ॥ 308 ॥
भास्कर पूर्वी करिता शिकार, नेम धरला वाघावर ।
गोळीने कुत्रा मेला सत्वर, त्याने पूर्व वैर साधिले ॥ 309 ॥
निरपराधे कुत्रा मेला, म्हणुन तो आज चावला ।
भास्करांचा मृत्यु आला, मी वैकुंठाला पाठवितो ॥ 310 ॥
भक्त म्हणती याला वाचवा, गुरु म्हणती प्रारब्ध ठेवा ।
भोग भोगूनि संपवावा, उसना न घ्यावा भोग पुढे ॥ 311 ॥
मग म्हणती गुरुदेवे, आता तुमचे भिडेस्तव ।
चौ-यांशी सुदिन स्वयंमेव, रक्षितो भेव नाही यासी ॥ 312 ॥
मग सर्व आले शेगांवात, बाळापूरची सांगती मात ।
धन्य धन्य भास्कर भक्त, समर्था म्हणत धन्य धन्य ॥ 313 ॥
पुढे भास्करांनी त्वरित, सुरु केले मंदिर कार्याप्रत ।
तन मन धन समर्पित, गुरु मंदिर बांधावे प्रशस्त ॥ 314 ॥
सर्व म्हणती होये होये, परि भास्करांचे मना नये ।
म्हणती नुसते बोलता काये, शिवा पाय समर्थांचे ॥ 315 ॥
दिव्य मंदिर बांधण्याची, शपथ घ्या गजाननाची ।
ही विनंती माझी शेवटची, पूरवा साची भाविक हो ॥ 316 ॥
ही संतसेवा कधीही, वाया तुमची जाणार नाही ।
इच्छा पुरती सर्वही, देती ग्वाही पुराणे ॥ 317 ॥
मी उभारिले मंदिरास, परि आयुष्य चौ-यांसी दिवस ।
म्हणून पुरवा माझे इच्छेस, साह्य देवळास करावे ॥ 318 ॥
तेंव्हा हरि पाटील म्हणाले, आम्ही मंदिर बांधू पाहिले ।
हे ऐकोनि भास्कर आनंदले, म्हणती भले केले तुम्ही ॥ 319 ॥
भास्कर महाशिवरात्रीसी, गुरुसह आले त्र्यंबकेश्वरासी ।
नाशिक पंचवटी तीर्थ,भेटती गोपालदास महंता ॥ 320 ॥
पुरुषोत्तम मासी फिरले भास्कर, अधिक चैत्र संपल्यावर ।

शेगांवी परतूनि सत्वर, श्रीमंदिर कार्य सुरु केले ॥ 321 ॥
रामनवमी कीर्तन आटोपुन, भक्तांसह येता अडगांवा-लागून ।
हनुमान जयंती लागून, सप्ताह मांडिला गुरुवरे ॥ 322 ॥
पीतांबर भास्करा पुसती, महाराजा धन्य गुरुभक्ति ।
एकोणचाळीस वर्षे निश्चिती, गुरुसेवेप्रती तुम्ही केले ॥ 323 ॥
क्षत्रियतेज होते अंगात, ते टाकुन तुम्ही झाले शांत ।
गजानन कृपेने बनले संत, जगी विख्यात भक्तराज ॥ 324 ॥
धन्य धन्य गुरु गजानन, साक्षात खरे संत पूर्ण ।
भास्कर वदती यांचे चरण, सोडू नका माझी आण ॥ 325 ॥
मग श्रीगुरुंनी वंदिले, भास्करासी ह्रदयी धरिले ।
गहिवरुनी ऐसे म्हणाले, मज केले कृतार्थ तूं ॥ 326 ॥
ऐक ब्राम्हणाच्या पोरा, हा ब्रम्हरुप खेळ सारा ।
उदयाचा गुरुवार बरा, जा चिद् भास्करा ब्रम्हपुरासी ॥ 327 ॥
गहिवरले गजानन, भास्कर माग रे वरदान ।
मी झालो सुप्रसन्न, भास्कर वचन बोलती ॥ 328 ॥
अन्य नाही शेष वासना, घडो श्रीचरण उपासना ।
जन्मा येऊनि वैष्णव सदना, देव संतांना भजेन मी ॥ 329 ॥
ऐसे बोलता भास्कर, प्रसन्न झाले श्रीगुरुवर ।
धन्य तु माझा भक्त थोर, दिला वर सर्व तुला ॥ 330 ॥
तुझा हेतू पुरविण्यासाठी, मी नित्य राहीन तुझ्या ठायी ।
तुही तुझ्या माझ्या ठायी, कदापिही राहिना ॥ 331 ॥
मग सप्ताहाचा भला, गुरुवारी झाला काला ।
भास्कर म्हणती श्रीगुरुला, आज्ञा मला द्यावी आता ॥ 332 ॥
आटोपली सर्वांची भोजने, पीतांबर कार्य केले त्वरेने ।
तिसरा प्रहर पूर्णपणे, मज पाठविणे प्रभुसेवे ॥ 333 ॥
श्री गजाननांचे समोर, उत्तराभिमुख आसनावर ।
पद्मासनस्थ श्रीभास्कर, महानिर्याण तयारिसी ॥ 334 ॥

पद्मासनी होऊनी स्थिर, वेगी ध्याती श्री गुरुवर ।
गजानन म्हणती सत्वर, निर्वीकार मन करी ॥ 335 ॥
धन्य धन्य गुरुकृपा ही, भास्कर महाराज झाले विदेही ।
सर्व ब्रम्हरुप दृष्टी पाही, आठव नाही गुरुविना ॥ 336 ॥
अरे हा बंधु तुमचा, समाधी बैसतो साचा ।
घोष करा हरिनामाचा, गुरु आनंदे बोलती ॥ 337 ॥
तुलसी बुक्का सुमन चंदन, वर्षताती सर्व भक्त-गण ।
गजानन भास्कर ऐसे भजन, करिती भक्त आनंदे ॥ 338 ॥
सन एकोणीसशे सात, चैत्र कृष्ण पंचमीस ।
गुरुवारी तृतीय प्रहरास, समाधीस्त खास भास्करबाबा ॥ 339 ॥
अडगांवचे उत्तरेस, गुरु आले द्वारकेश्वरास ।
एकांत तपोभूमी खास, तेथे भास्करास आणिले ॥ 340 ॥
द्वारकेश्वर सान्निध्यासी, सती देवी पार्वती पासी ।
गुरु बैसले ज्या तपोभूमीसी, तेथे समाधीसी स्थापिले ॥ 341 ॥
निर्मिले समाधीचे स्थान, पुष्पे बुक्का वर्षती गजानन ।
भास्कर महाराजा पूजोन, केले स्थापना स्वहस्ते ॥ 342 ॥
बंद करोनिया द्वार, आरती करिती गुरुवर ।
स्नाने करिती लहानथोर, सुनंदातीर दुमदुमले ॥ 343 ॥
चैत्र कृष्ण पंचमीसी, पुंडलिक होते अमरावतीसी ।
भास्करांनी दृष्टांत दिला त्यासी, आम्ही समाधीसी बैसतसे ॥ 344 ॥
गजानन म्हणती पुंडलिका, धन्य धन्य भास्कर सखा ।
ऐसा कोणी नसे या लोका, जो गुरुसेवका पूज्य सदा ॥ 345 ॥
हाचि माझा खरा भक्त, तू शोक न करि राहा शांत ।
आत्मा कधी नाही जन्मत मरत, न जळे बुडत केंव्हाहि ॥ 346 ॥
जो करील भास्कर स्मरण, त्याची इच्छा मी पुरवीन ।
जे घेती येथे दर्शन, त्यांना विघ्न बाधीना ॥ 347 ॥
मग काला करोनि जाण, प्रसाद देती गजानन ।

भक्त करिता भोजन, कावळे धावून तेथे आले ॥ 348 ॥
भास्करांचे प्रसादासी, मी देतो कावळ्यासी ।
उच्छिष्ट पात्र देऊनि त्यांसी, घातले सर्वांसी भोजन ॥ 349 ॥
चार तपापर्यंत जाण, तुम्ही वर्जावे हे ठिकाण ।
मग श्री भास्करांसी वंदून, कावळे उडोन सर्व गेले ॥ 350 ॥
सर्व उत्सव संपल्यावर, शेगांवी गेले गुरुवर ।
पूर्ण रूपे ते निरंतर, असती भास्कर बरे नित्य ॥ 351 ॥

॥ जय गजानन॥
॥ ॐ नमो भगवते गजाननाय ॥
॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥
जयदेव जयस्वामी गुरु महाराजा
वांगणी निवासी उल्हासी राजा । जयदेव जयदेव ॥
बाळकृष्ण रुप धरुनी ध्यातो मी तू ते ॥
दर्शनमात्रे आशिर्वचना भक्ता उध्दरि ते
नामालागी बसला भक्ता आधार

नित्य तूज स्मरता विठ्ठल साकार । जयदेव जयदेव ॥ 1 ॥
गुरु महिमा ऐसा रुप शिव शक्ती
नायक ब्रम्हांडाचा लावी नामाची गोडी
स्वामी सांगे भक्ता गावा गुरुमहिमा
प्रसन्न तेणे श्रीहरि नामाचा महिमा ॥ जयदेव जयदेव ॥ 2 ॥

॥ जयघोष ॥
॥ अनंतकोटी ब्रम्हांडनायक महाराजाधिराज योगिराज परब्रम्ह सच्चिदानंद
भक्तप्रतिपालक बाळकृष्णस्वरुप वांगणी निवासी सदगुरु गजानन बाबा की जय ॥
॥ ॐ श्री गजानन बाबा ॥